सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.२३/का.५.
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १७/७/२०१२.

प्रति,
आयुक्त,
सर्व महानगरपालिका

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक
प्रभाग रचनेच्या नकाशांवर नगर रचनाकारांची स्वाक्षरी
असण्याबाबत...

महोदय,

महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्यावेळी प्रारूप प्रभाग रचनेचे प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येतात. या प्रस्तावासोबत प्रभागांच्या हद्दी दर्शविणारे नकाशे सादर करण्यात येतात. तसेच आरक्षित प्रभागांची सोडत काढताना, प्रारूप व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करताना मतदारांना प्रभागांच्या सीमा/हद्दी योग्यरित्या लक्षात याव्यात याकरिता नकाशे जाहीर करण्यात येतात. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की बऱ्याचदा राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या अथवा सोडत किंवा प्रभाग रचना प्रसिध्दीच्या वेळी जाहीर करण्यात येणाऱ्या नकाशांवर केवळ महानगरपालिका आयुक्तांचीच स्वाक्षरी असते.

महापालिकेच्या हद्दींबाबत असे नकाशे संबंधित नगर रचनाकारांनी व महानगरपालिका आयुक्तांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. तरी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रभाग रचनेचे प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करताना तसेच आरक्षित प्रभागांची सोडत काढताना, प्रारूप व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करताना महापालिकेच्या हद्दींबाबतचे नकाशे संबंधित नगर रचनाकारांनी व महानगरपालिका आयुक्तांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

( अ. गो. जाधव )
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Local Disk (D)\My Documents\aab-New EVM.doc